स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

शारीरिक शिक्षणशास्त्र विद्याशाखा अंतर्गत शारीरिक शिक्षण विषयाच्या विद्यावाचस्पती (पी.एच.डी.) पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय

''मराठवाडा विभागातील खो-खो व कबड्डी खेळ संघटनांचा राज्यपातळी वरील स्पर्धेतील कामगिरीचा तुलनात्मक अभ्यास'' हे एक विश्लेषण

संशोधक
श्री.संजय भुमरे

मार्गदर्शक

डॉ.जुझारसिंघ सिलेदार
क्रीडा संचालक
पिपल्स कॉलेज, नांदेड.

२०१७

‘‘मराठवाडा विभागातील खो-खो व कबड्डी खेळ संघटनांचा राज्यपातळी वरील स्पर्धेतील कामगिरीचा तुलनात्मक अभ्यास’’ हे एक विश्लेषण

प्रकरण- पहिले

प्रस्तावनाः-

महाराष्ट्रातील मराठवाडा विभाग हा एक महत्वाचा क्रीडा क्षेत्रातील भाग आहे. हा भाग औरंगाबाद प्रशासकिय विभागाशी जोडला गेलेला आहे. भौगोलीक दृष्टया मराठवाडा हा निसर्गसंपन्न आहे. मराठवाडा विभागात एकुण आठ जिल्हे आहेत. ते जिल्हे नांदेड, लातुर, उस्मानाबाद, बीड, औरंगाबाद, जालन, परभणी व हिंगोली हे आहेत. या विभागाची लोकसंख्या १,८७,३,१८७२ ऐवढी आहे. त्यापैकी ८० टक्के लोकसंख्या हि ग्रामीण भागात राहतात. त्यामुळे देशी खेळ हे जास्त प्रमाणात खेळले जातात. उदा. खो-खो, कबड्डी, कुस्ती इत्यादी. त्यामुळे या देशी खेळाच्या विकासामध्ये बांधनी मध्ये प्रबोधन आणि प्रसार व प्रचारसाठी क्रीडा संघटनां महत्वाची भुमीका बजावत असतात. क्रीडा संघटनांचा इतिहास अभ्यासला असतांना क्रीडा संघटना हया नविन मनुष्य बळ तयार करणे, नवीन प्रतीभेचा शोध घेणे स्थानिक खेळाडूंना योग्य ते मार्गदर्शन करून त्यांना गाव पातळी ते राज्यपातळी पर्यत संधी

उपलब्ध करून देण्याची महत्वाची भूमीका बजावत असतात. क्रीडा संघटना हया कबड्डी व खो-खो या सारख्या देशी खेळांच्या नवीन खेळाडूंना संधी उपलब्ध करून देतात व त्या खेळाडूंना प्राथमिक सोयी व सुविधा देऊन खेळाडूंची कामगीरी सुधारण्याचा पर्यत करतात. या कबड्डी व खो-खो संघटनांमुळे या खेळाडूंना एक व्यासपीट मिळते. या जिल्हा संघटना कबड्डी व खो-खो या देशी खेळांच्या विकासासाठी कार्य करत असतात. परंतु कबड्डी व खो-खो संघटनांचा राज्य पातळीवर तुलणात्मक अभ्यास केला असता त्यांचे कार्य, धोरण, मर्यादा हया वेगवेगळया आहेत. त्याचाच तुलनात्मक आभ्यास करतांना या बाबी लक्षात येतात.

खो-खो

खो-खो हा भारतातील सर्वात लोकप्रिय खेळा पैकी एक खेळ आहे. खो-खोची उत्पत्ती शोधणे कठीण आहे. परंतू अनेक इतिहासकारांचा असा विश्वास आहे की, हा चालविण्याचा एक सुधारित फॉल आहे. ज्याचा सर्वात सोपे रूप म्हणजे एखादयाला पाठलाग करणे आणि त्याला स्पर्श करणे. प्राचीण महाराष्ट्रातील खो-खो हा रथ किंवा रथावर खेळला आणि त्याचे नाव रथार असे होते. खो-खो खेळल्यामुळे स्वस्त शरीर, आनंददायक, वेग , तगधरण्याची क्षमता व खेळण्यास सोपा. खो-खो खेळाडू अंगी आज्ञाधारक, शिस्त, क्रीडापटू आणि संघ सदस्यामधील निष्ठा यांचे गुण विकसीत होतात.

२० व्या शतकात नियम तयार करण्यात आले. १९१४ साली जिमखाना पुणे येथे समिती निवड करण्यात आली. १९१४ साली बडोदा येथुन खो-खो ला पहिल्यांदा नियम प्रकाशीत झाले. १९३६ साली बर्लिन येथे झालेल्या ऑलिंपिक मध्ये हनुमान व्यायाम शाळा अमरावती वतीने खो-खो खेळाचे प्रदर्शन केले. १९५९-६० साली पहिली राष्ट्रीय खो-खो स्पर्धा, विजयवाडा (आंध्रप्रदेश) येथे पार पाडली.

२१ ते २४ सप्टेंबर १९९६ साली कलकत्ता येथे पहिली एशियने खो-खो स्पर्धा पार पाडली. या स्पर्धेत भारत, बांगलादेश, श्रीलंका , पाकिस्तान, व नेपाळ हे देश सहभागी होते.

२०१२ साली बारामती येथे राष्ट्रीय स्पर्धेसाठी अधुनिक मॅटचा वापर करण्यात आला.

खो-खो खेळात एकुण १२ खेळाडू असतात. मैदानात एका संघात ९ खेळाडू खेळतात. सामन्यात एका संघास एक संरक्षक व एक आक्रमक मिळुन एक डाव होतो असे दोन डाव खेळावे लागतात.

खो-खो खेळासाठी पुरूष, महिला, कुमार,व मुलीं या गटासाठी ९ मिनीटाची एक पाळी अशा चार पाळी खेळाव्या लागतात. किशोर-किशोरी गटासाठी ७ मिनीटाची एक पाळी अशा चार पाळी खेळाव्या लागतात.

खो-खो खेळाचे मैदान पुरूष, महिला, कुमार,व मुलीं या गटासाठी २७ मिटर बाय १६ मिटर व किशोर-किशोरी गटासाठी २३ मिटर बाय १४ मिटर असते.

खो-खो खेळातील पुरस्कार पुरूषांसाठी- एकलव्य पुरस्कार, महिलांसाठी- राणी लक्ष्मीबाई पुरस्कार, कुमारसाठी- वीर अभिमन्यु पुरस्कार, मुलींसाठी- जानकी पुरस्कार, किशोरसाठी- भरत पुरस्कार व किशोरीसाठी- ईला पुरस्कार

कबड्डी

कबड्डी प्रामुख्याने एक भारतीय खेळ असली तरी या खेळाबद्दल मुळ माहिती फारशी नाही. तथापी ठोस पुरावे आहेत. खेळ ४००० वर्ष जुना आहे. हा एक संघ खेळ आहे. ज्यात कौशल्य आणि शक्ती दोन्ही लागते. यात कुस्ती आणि रग्बीची वैशिष्टये आहेत. हा खेळ गटांनी खेळला जातो. हा खेळ सोपा व स्वस्त आहे. यात मोठे मैदान किंवा महागडे साहित्याची गरज नसते. हा ग्रामीण भारतातील खेळाची लोकप्रियता स्पष्ट करते. कबड्डी सर्व आशिया मध्ये खेळला जातो ज्यात किरकोळ फरक आहे.

कबड्डीला शेडगुडू किंवा हुतूतू, पूर्व भारतात हुडूडू, चू-किट-किट आणि उत्तर भारतातील कबड्डी या नावाने ओळखला जातो.

भारत, पाकिस्तान, नेपाळ, इराण, श्रीलंका इत्यादी देश हा खेळ खेळतात. कबड्डी या खेळात एकुण १२ खेळाडू असतात. मैदानात एका संघात ७ खेळाडू खेळतात.

कबड्डी फेडरेशची स्थापना १९५० साली झाली. अमेच्युअर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडिया ची स्थापना १९७३ ने नियमांना नविन आकार दिला.

मा.शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली आशियाई कबड्डी फेडरेशची स्थापना झाली.

सामन्याचा वेळ हा पुरूष व कुमार गटासाठी २० मिनिटाचा एक डाव असे दोन डावात होतात. एकुण ४० मिनिट व महिला, कुमारी, किशोर व किशोरी गटासाठी १५ मिनिटाचा एक डाव असे दोन डावात होतात. एकुण ३० मिनिट लागतात.

कबड्डी मैदान पुरूष व कुमार गटासाठी १३ मिटर बाय १० मिटर व महिला, कुमारी गटासाठी १२ मिटर बाय ८ मिटर व किशोर-किशोरी ११ मिटर बाय ८ मिटर

अभ्यासाचे महत्वः-

1- एखादया विभागातील खेळ संघटनांची कामागिरी अभ्यासतांना या संघटना त्या खेळाच्या विकासामध्ये प्रशिक्षण, प्रबोधन आणि मणुष्यबळ विकास या दृष्टीने कोणते योगदान घडवितात या बाबत अभ्यास केला असता संघटनेचे कार्य अधिक चांगल्याप्रकारे स्पष्ट करता येऊ शकते.

2- त्या विभागातील क्रीडा संघटनांचा इतिहास अभ्यासला असता त्यांच्या वर्तमान उपक्रमांची कल्पना येते कारण भुतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ हा त्या संघटनेच्या परंपरांशी निगडीत असतो.

3- स्थानिक खेळाडुंना यथायोगय मार्गदर्शन करून त्यांना जिल्हा, प्रादेशिक व राज्यस्तरावर उतरविण्याचे कार्य खेळाच्या संघटना करतात. महाविद्यालय व विद्यापीठाच्या जोडीला त्या संघटनांचे कार्य नविन प्रतिभेचा शोध आणि विकास या बाबतीत पारदर्शक ठरतो.

4- खेळाच्या संघटना त्या खेळाच्याविकासासाठी अभ्यासवर्ग, चाचणी स्पर्धा, सराव व प्रशिक्षण याद्वारे सातत्याने नवनवे प्रयोग करतात. त्यातुन त्या खेळाची संस्कृती त्या प्रदेशात रूजविली जाते. याबाबतीत संघटनांच्या कार्याचा खेळावर पडलेला प्रभाव अभ्यासला असता त्या खेळाचे महत्व लक्षात येते.

5- कबड्डी, खो-खो या सारख्या देशी खेळामध्ये खेळाडु व संघाना राज्यस्तरावर भाग घेण्यासाठी या संघटना पथदर्शक करतात. त्यातुन खेळाडुंची कामागिरी सुधारते. ही कामागिरी कशाप्रकारे सुधारते त्याचे विश्लषन केले असता संघटनाच्या कार्यात सुधारण करणे शक्य आहे.

संशोधनांची उद्‌दीष्टेः-

1- मराठवाडा विभागातील कबड्डी व खो-खो या दोन देशी खेळाच्या जिल्हा संघटनांचा खेळ व क्रीडा क्षेत्रातील योगदानाचा अभ्यास करणे.

2- दोन देशी खेळाच्या संघटनांच्या रचना व विविध उपक्रमांचे मराठवाडयाच्या संदर्भात तुलनात्मक अध्ययन करणे.

3- मराठवाडा विभागातील कबड्डी व खो-खो जिल्हा संघटनाद्वारे राज्य पातळीवर पाठविण्यात आलेल्या खेळाडुंच्या कार्यमानाचा व त्याच्यासाठी आयोजीत मार्गदर्शन शिबीराचा अभ्यास करणे.

4- मराठवाडा विभागातील कबड्डी, खो-खो जिल्हा संघटनाद्वारे आयोजीत केलेल्या राज्य पातळीवरील स्पर्धाचा आढावा घेणे.

5- मराठवाडा विभागातील कबड्डी, खो-खो संघटनांच्या कार्यातील अडचणी लक्षात घेवून त्यावर उपाय सुचित करणे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादाः-

सदरील संशोधनाचा मुख्य अभ्यास मराठवाडा विभागापुरताच मर्यादित असुन. मराठवाडा विभागाच्या बाहेरच्या संघटनांचा विचार करण्यात येणार नाही. मागील पाच वर्षाच्या कामगिरीचाच अभ्यास करण्यात येईल.

संशोधनाची गृहीतकेः-

1- मराठवाडा विभागातील कबड्डी व खो-खो या जिल्हा खेळ संघटनांचे योगदान अधिक प्रभावी आहे.

2- मराठवाडा विभागा मध्ये राज्य व जिल्हा खेळ संघटनांच्या विकासात्मक कार्यमुळे नवोदित खळाडूंना प्रोत्साहन मिळते.

3- मराठवाडा विभागात खो-खो व कबड्डी खेळांच्या संघटना विविध उपक्रम आखुन खेळाचा दर्जा उंचावित आहे.

4- विद्यार्थी व पालकांना सहभागी करून घेतल्यामुळे संघटनेच्या उपक्रमास सामर्थ्य लाभत आहे.

प्रकरण २ पूर्व संशोधनाचा आढावाः

या प्रकरणात प्रथम साहित्याचा आढावा घेणे कसे महत्वाचे आहे. हे नमुद केले जाणार आहे. तसेच साहित्याचे वर्गीकरण व त्याचे लाभ स्पष्ट करून आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय प्रादेशिक व स्थानिक आध्ययनाचा आढावा घेतला जाणार आहे. तसेच काही संकेतस्थळे व इंटरनेटवरील शोध निबंधाचाही आढावा थोडक्यात दिला जाईल. पुर्व संशोधनाच्या मर्यादा स्पष्ट करून या संशोधनातील अभ्यासाचे वेगळेपण स्पष्ट केले जाईल. त्यामुळे या अभ्यासाला निश्चित दिशा देण्यासाठी ही पूर्व अध्ययण कशी उपयुक्त ठरतात. हे या प्रकरणात मांडणे शक्य होणार आहे.

प्रकरण- ३ संशोधन पध्दतीः

या प्रकरणामध्ये सामाजिक संधोधन शारिरीक शिक्षण संधोधन या संकल्पना स्पष्ट करून तथ्य संकलनाची प्राथमिक व दुय्यम साधने म्हणजे सर्वेक्षण, मुलाखती, निरीक्षण तसेच ग्रंथ, चरीत्रे, आठवणी स्मरणिका इत्यादी साधनांचा तपशिल दिला जाणार आहे. येथे खेळ संघटनांच्या कार्याचे वर्णण केले जाईल तयामुळे वर्णणात्मक संधोधन आराखडा वापरून संधोधन पध्दतीवर प्रकाश टाकता येईल. असे करतांना वर्णणात्मक आराखडयातील प्रमुख टप्पेही नोंदविले जातील. तसेच संशोधनाच्या मर्यादाही स्पट केल्या जातील.

प्रकरण–४ माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचनः

या प्रकरणामध्ये क्षेत्रीय पाहणीचा अहवाल दिला जाईल. त्यामध्ये कबड्डी व खो–खो या खेळाडुंच्या सामाजिक पाहणीचा उपदेश, उत्तरदात्यांचीर सामाजिक व आर्थिक माहिती तसेच येथे केलेल्या सामाजिक पाहणीतील प्रमुख घटक जसे प्राथमिक माहिती, क्रीडा कार्यमान व शिबीर उपक्रमांचा अभ्यास, राज्य पातळीवरील स्पर्धाचा आढावा आणि अडचणी व उपाय या घटकातील प्रश्नावलीचा आढावा घवून तालीका व आलेखाच्या आधारे शास्त्रीय विश्लेषण केले जाईल व अनुमाने काढले जातील.

प्रकरण– ५ निष्कर्ष सारांश व शिफारशीः

या प्रकरणात प्रथम प्रकरणनिहाय सारांक्ष दिला जाईल त्यानंतर समोर आलेले ठळक निष्कर्ष नोंदविले जातील आणि सुचना व शिफारषी केल्या जातील नवी सैध्दान्तिक मांडणी करून पुढील संशोधनासाठी काही विषयही सुचित केले जातील.

तसेच हे संशोधन मराठवाडा विभागातील कबड्डी व खो–खो च्या संघटना व त्यात सहभागी होणारे खेळाडु व संघटनांचे उपयुक्त कसे ठरेल याची शहानिशा करण्यात येईल.

अशा प्रकारे मराठवाडा विभागातील खेळसंघटनांच्या राज्यपातळीवरील योगदानाचा तुलनात्मक अध्ययन करण्यात येईल क्रीडा संघटनाची कामगिरी व उपक्रम हा अभ्यासाचा केंद्रबिंदु होय.

मराठवाडयातील कबड्डी व खो-खो या खेळांची जुनी परंपरा असुन ती टिकवून धसरण्याचे आणि वाढविण्याचे श्रेय मराठवाडा विभागातील या संघटनाकडे जाते.

नजिकच्या भविष्यकाळात अशा प्रादेशिक क्रीडा संघटनानी राज्य सरकारशी समन्वय साधून जिल्हा क्रीडा अधिकारी व क्रीडा संचालनालय यांच्या मदतीने देशी खेळाच्या विकासाठी अधिक पावले टाकली पाहिजेत.

संशोधक | **मार्गदर्शक**

श्री.संजय भुमरे

डॉ.झुझारसिंघ सिलेदार
क्रीडा संचालक
पिपल्स कॉलेज, नांदेड.